**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीचे अधिकार प्रदान करण्याबाबत.**

छाननी समितीस मुदतवाढ देणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**नियोजन विभाग, (रोहयो)**

**शासन निर्णय क्रमांक- मग्रारो-२०१६/प्र.क्र.३४/रोहयो-१०**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**

**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**

**दिनांक:- १६ एप्रिल, २०१८.**

वाचा:- १) शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४७/रोहयो-१०,दि. ८/६/२०१०

२) शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४७/रोहयो-१०,दि. ३/८/२०११

३) शासन निर्णय क्रमांक- मग्रारो-२०१६/प्र.क्र.३४/रोहयो-१०, दि. १७ जून, २०१६

४) शासन निर्णय क्रमांक- मग्रारो-२०१६/प्र.क्र.३४/रोहयो-१०, दि. २९ ऑगस्ट, २०१७

५) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे क्र. २०१८/रोहयो/जन-७/कावि, दि. २८ मार्च, २०१८ चे अ.शा. पत्र.

प्रस्तावना-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत प्रशासकीय तांत्रिक मंजुरीचे अधिकार प्रदान करण्याबाबत शासन निर्णय दि. १७ जून, २०१६ अन्वये छाननी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समिती ९ महिन्यासाठी गठीत करण्यात आली होती. सदर समितीची मुदत दि. १६ मार्च, २०१७ रोजी संपुष्टात आल्यानंतर समितीस शासन निर्णय दि. २९ ऑगस्ट, २०१७ अन्वये दि. १७ मार्च, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर समितीस मुदतवाढ देण्याची विनंती विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी त्यांच्या दि. २८ मार्च, २०१८ च्या अ.शा. पत्रान्वये शासनास केलेली आहे. औरंगाबाद विभागातील कामाची निकड लक्षात घेता, सदर समितीस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

औरंगाबाद विभागात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व त्याअंतर्गत “समृध्द महाराष्ट्र जनकल्याण योजनेची” प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी तसेच औरंगाबाद विभागात नव्याने सुरु झालेल्या कामांचा आवाका लक्षात घेता त्याचप्रमाणे छाननी समितीमार्फत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची विविध सार्वजनिक व वैयक्तिक लाभाच्या कामाच्या प्रस्तावांची छाननी करुन आवश्यक कामाची शिफारस करण्याचे कामकाज केले जात असल्याची बाब विचारात घेवून समितीस दि. १८ मार्च, २०१८ ते १७ मार्च, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर समितीची कार्ये शासन निर्णय दि. १७ जून, २०१६ मध्ये नमूद केल्यानुसारच

राहतील. तसेच छाननी समितीची मुदत संपण्याच्या १ महिना आधी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी याप्रकरची छाननी समिती सुरु ठेवण्याबाबत व त्याची व्याप्ती राज्यभर करण्याच्या दृष्टीने सविस्तर अभिप्राय शासनास सादर करावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०४१६१३१५१५६०१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dr. Pramod Sopan Shinde

Digitally signed by Dr. Pramod Sopan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=86df3b89584863ae114ab9dcc19318acf0e1e94714d4f3f2196a35403313b298, cn=Dr. Pramod Sopan Shinde
Date: 2018.07.11 15:20:18 +05'30'

**( प्रमोद शिंदे )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक,
५. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व विभागीय आयुक्त,
८. नरेगा आयुक्त, नागपूर
९. प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
१०. आयुक्त, (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
११. सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक
१२. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा)
१३. महालेखापाल १ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई, नागपूर
१४. महालेखापाल २ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र मुंबई/नागपूर,
१५. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून),
१६. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
१७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१८. सर्व विशेष कार्यकारी अधिकारी तथा उप विकास आयुक्त (रोहयो),

१९. सर्व तहसिलदार,

२०. सर्व गट विकास अधिकारी,

२१. मुख्य अभियंता, ल.पा. (स्था.स्तर) पुणे,

२२. संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

२३. सर्व उपसचिव, अवर सचिव, सहायक संचालक (लेखा), कक्ष अधिकारी, सांख्यिकीय अधिकारी (रोहयो प्रभाग),

२४. उप संचालक/रोहयो-९ यांच्याकडे संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता अग्रेषित.

२५. कक्ष अधिकारी, रोहयो-१, सारसंग्रहाकरिता,

२६. निवडनस्ती, रोहयो-१०.

..................